पनवेल : प्रतिनिधी

गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी थापा मारून जनतेची दिशाभूल करीत आहेत, तर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आताच रस्त्यावर आलेत. हे लोक काय पंतप्रधानपद भूषविणार? देश चालविण्याची कुवत ही ध्येय-धोरणे मानणाऱ्या काँग्रेस पक्षातच असून, आगामी निवडणुका पक्ष विकासाच्या मुद्द्यावर लढवेल, असे राज्याचे उद्योगमंत्री आणि काँग्रेसची मुलूखमैदान तोफ नारायण राणे यांनी बुधवारी (दि. २२) येथे स्पष्ट केले.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि पनवेल शहर व तालुका काँग्रेस कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयात आयोजित मल्हार महोत्सवाचे शानदार उद्घाटन श्री. राणे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते मार्गदर्शन करीत होते. आपल्या तडाखेबंद आणि तितक्याच अभ्यासपूर्ण भाषणात त्यांनी विविध मुद्द्यांना स्पर्श केला.

नारायण राणे म्हणाले की, खरं तर मी आजारी आहे. सर्दी, ताप, खोकल्याने बेजार आहे, पण माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या स्नेहामुळे, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रेमामुळे माझे पाय पनवेलकडे ओढले गेले. येथे येऊन मला अतिशय आनंद तर झालाच, शिवाय पनवेल गौरव, रायगड गौरव पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा गौरव करण्याचे भाग्यही लाभले. ही संधी दिल्याबद्दल मी आपणा सर्वांचा ऋणी आहे.

चांगला लोकप्रतिनिधी मिळणे हा नशिबाचा भाग असतो. लोकांचे प्रश्न समजून घेत, त्यांच्या सुखदु:खात समरस कोण होतो हे ओळखून त्याच्या पाठीशी जनतेने ठामपणे उभे राहणे गरजेचे असते. मग तो लोकप्रतिनिधी अधिकाधिक विकास करतो. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार यांनी जशी आपल्या भागात कार्य करून स्वत:ची ओळख निर्माण केली. तसे रायगड म्हटले की, रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांचे नाव समोर येते, असे नारायण राणे यांनी सांगताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी म्हणून ओळखला जाणारा रायगड जिल्हा हे माझे आवडत्या ठिकाणांपैकी असल्याचा उल्लेख करून नारायण राणे म्हणाले की, या रायगड जिल्ह्यात प्रकल्प, उद्योग येत असताना, येथील स्थानिक भूमिपुत्रांना, प्रकल्पग्रस्तांना त्यात रोजगार मिळालाच पाहिजे, पण नव्या पिढीने केवळ नोकऱ्या करून भागणार नाही, तर स्वत: उद्योजक, व्यावसायिक बनून आपला उत्कर्ष साधला पाहिजे. तेव्हाच रायगडात खऱ्या अर्थाने आर्थिक सुबत्ता येईल. त्यासाठी मल्हार महोत्सवातून विचारमंथन होऊन दिशा मिळावी, अशी सदिच्छा नारायण राणे यांनी व्यक्त केली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेत नारायण राणे म्हणाले की, मी अनेक नेते पाहिले आणि पाहतो, पण श्रीमंतीचा गर्व आणि पदाचा लोभ नसणारा रामशेठ ठाकूर हा एकमेव लोकनेता आहे. सर्व काही असताना सर्वसामान्य माणसासारखे आयुष्य जगून लोककल्याण साधण्यासाठी मनाचा मोठेपणा असावा लागतो. तो रामशेठ ठाकूर यांच्याकडे आहे. ते राजकारणातून निवृत्त झाले असले, तरी जनसेवेतून झालेले नाहीत, याकडेही श्री. राणे यांनी लक्ष वेधले.

नारायण राणे यांनी तरुण, तडफदार आणि कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांचीही मुक्तकंठाने स्तुती केली. ते म्हणाले, पनवेलची जनता भाग्यवान आहे की त्यांना प्रशांत ठाकूर आमदार म्हणून लाभले. मी त्यांचे काम विधानसभेत पाहत असतो. आपल्या मतदारसंघातील कामे मार्गी लागावी, यासाठी ते मंत्र्यांच्या नेहमी मागे लागलेले असतात. हा दिखावा नाही, तर ही तळमळ आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा समाजसेवेचा पिंड लाभलेला त्यांचा मुलगा आमदार प्रशांत ठाकूर यांचेही भवितव्य उज्ज्वल आहे. मी त्यांच्या पाठीशी नव्हे, तर सोबत आहे. तुम्हीही त्यांना कायम साथ द्या. मग सिंधुदुर्गात जसा विकास होतोय, तसा पनवेलमध्येही घडवून आणू, अशी ग्वाही नारायण राणे यांनी दिली.

नारायण राणे यांनी आपल्या भाषणात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची पोलखोल केली. ते म्हणाले, केजरीवाल हे स्वत:च आम आदमी नाहीत. ते व त्यांची पत्नी 'ॲडीशनल कमिशनर' म्हणून काम करताना प्रत्येकी ८० हजार याप्रमाणे एकूण १ लाख ६० हजार रुपये पगार घेत होते. चार बेडरूमच्या फ्लॅटमध्ये राहणारे हे कसले आम आदमी? 'आप' सरकारने दिल्लीत वीज मोफत दिल्याबाबत बोलताना राणे यांनी सांगितले की, केजरीवाल सरकारने तेथील फक्त ३० टक्के जनतेला वीज मोफत दिली असून, त्यापोटी केवळ तीन महिन्यांना ४०० कोटी रुपयांचा तोटा या सरकारला सहन करावा लागणार आहे. सरकारी तिजोरीतील पैसा संपल्यावर केजरीवाल हे काय रिझर्व्ह बँकेची शाखा घरी टाकून नोटा छापणार आहेत का, असे वास्तव दर्शविणारा खडा सवाल राणे यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्रीपदी विराजमान होऊन काही काळ जात नाहीत, तोच केजरीवाल महाशय रस्त्यावर आले, अशी खिल्लीही राणे यांनी उडविली.

नरेंद्र मोदी यांच्यावरही नारायण राणे यांनी शरसंधान साधले. ते म्हणाले, मोदी हे केजरीवाल यांच्यापेक्षा गरीब आहेत. त्यांचे वार्षिक उत्पन्न फक्त दीड लाख आहे, तर घर ४६० स्क्वेअर फुटांचे आहे. निवडणूक आयोगाला सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात हे सारे नमूद आहे. प्रत्यक्षात मोदी यांच्या कपडे, चपलांवरच लाखो रुपये खर्च होतात. ते जेथून कपडे शिवतात, त्या मुंबईतील टेलरचे नावही मला माहीत आहे असे सांगून, जो माणूस खोटे बोलतो, थापा मारतो, चुकीचे दाखले देतो तो काय देश चालविणार, असा जळजळीत सवाल राणे यांनी उपस्थित केला.

स्थानिक, महाराष्ट्रीय आणि भारतीय अशी एकत्रित संस्कृती मल्हार महोत्सवाच्या रूपाने एकवटली आहे. सर्व अंगांना स्पर्श करणारा हा महोत्सव विविधतेतून एकता जपणारा आहे, असे प्रशस्तीपत्रक ॲड. महादेव शेलार यांनी दिले. अनेक जण सधन आहेत, पण समाजासाठी खर्च करणारे कमी आहेत. रामशेठ ठाकूर याला अपवाद असून, ते रायगडची तकदीर घडविणारे लोकनेते आहेत, असे प्रशंसोद्गारही त्यांनी काढले.

जे हात लावतात ते सोने होते आणि ज्यांच्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये जान येते तो ढाण्या वाघ म्हणजे नारायण राणे असा उल्लेख करून ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी, 'विलासराव देशमुख व नारायण राणे एका व्यासपीठावर आल्याने पनवेलमध्ये प्रशांत ठाकूर यांच्या रूपाने काँग्रेस उमेदवाराने शेकापचा पराभव करीत ऐतिहासिक विजय मिळविला, असे नमूद केले. सर्वधर्मसमभाव जपून देशातील १२० कोटी जनतेला एकत्र ठेवणारा काँग्रेस एकमेव पक्ष आहे, असेही त्यांनी सांगितले.

विविध कलाकार, खेळाडूंना संधी देणारा मल्हार महोत्सव म्हणजे एक व्यासपीठ आहे, असे प्रतिपादन आमदार सुभाष चव्हाण यांनी केले. राज्य, तसेच राष्ट्रीय पातळीवर नावाजलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे मार्गदर्शक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे व्यक्ती नसून संस्था आहेत, असे गौरवोद्गारही आमदार चव्हाण यांनी काढले.

कोकणात अनेक मान्यवर व्यक्ती, संस्था आहेत. त्यांच्या विचाराने आणि विविध उद्योग, प्रकल्पांनी कोकण समृद्ध झाला पाहिजे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले. विकास होत असताना त्याची फळे ग्रामीण भागापर्यंतही पोहोचली पाहिजेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विकासाची व्यापक दृष्टी असणारे कोकणचे भाग्यविधाते नारायण राणे जे आदेश देतील तो निष्ठेने पाळू, असा शब्दही त्यांनी दिला.

समाजाला दिशा देण्याचे काम अनेक व्यक्ती, संस्था करीत आहेत. त्यांचा सन्मान समाजहितासाठी झटणाऱ्या नारायण राणे यांच्या हस्ते होतोय, ही अत्यानंदाची बाब आहे, असे सांगत आपल्या सर्वांचा आशीर्वाद असाच कायम राहू द्या, अशी विनंती आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. तब्येत ठीक नसतानाही उद्योगमंत्री राणे कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहिल्याबद्दल आमदारांनी त्यांचे जाहीर आभार मानले.

मल्हार महोत्सवाच्या उद्घाटन समारंभाला काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस नामदेव भगत, जिल्हा अध्यक्ष आर. सी. घरत, उपाध्यक्ष जी. आर. पाटील, तालुकाध्यक्ष लक्ष्मणशेठ पाटील, कार्याध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ कामगार नेते श्याम म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, नगराध्यक्ष चारुशीला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी आमदार श्याम सावंत, युवक काँग्रेसचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे अध्यक्ष सुदाम पाटील, काँग्रेस शहर अध्यक्ष जयंत पगडे, महिला काँग्रेसच्या शहर अध्यक्षा वर्षा नाईक, गव्हाणच्या सरपंच रत्नप्रभा घरत, काँग्रेसचे उरण तालुका अध्यक्ष मिलिंद पाडगावकर, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, महिला काँग्रेसच्या उरण तालुका अध्यक्षा सीमा घरत, नवी मुंबईचे नगरसेवक अमित पाटील, श्री. वाघमारे आदींसह नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध संस्था, संघटनांचे प्रतिनिधी आणि रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार कामगार नेते महेंद्र घरत यांनी मानले.

या कार्यक्रमात मान्यवर व्यक्ती, संस्थांना पनवेल गौरव आणि रायगड गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले. शेकापमधून काँग्रेस पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच ओवे ग्रामपंचायतीवर काँग्रेसचा तिरंगा झेंडा पुन्हा एकदा डौलाने फडकविणाऱ्या विजयी सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

00000

पनवेल गौरव : व्यक्ती
सामाजिक : दीपक मिराणी
शैक्षणिक : पंकज भगत
कला : नंदकुमार गोगटे
क्रीडा : परशुराम जितेकर
वैद्यकीय : डॉ. संतोष जाधव
साहित्य : प्रभाकर पाटील
संगीत : शरयू चिखलेकर, मधुकर उलवेकर
अध्यात्मिक : नारायणबुवा पाटील
कामगार : पद्माकर नाईक
अर्थ : मनोहर मुंबईकर

पनवेल गौरव : संस्था
अंत्यविधी सेवा संस्था
काळण समाज संस्था
फुलमाळी समाज ॲण्ड पोदी ट्रस्ट
पनवेल तेली समाज मंदिर प्रतिष्ठान
श्री पनवेल गुजराती नवरात्रौत्सव मंडळ
शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना
इन्स्टिट्युट ऑफ योग ॲण्ड आयुर्वेद आणि आरोग्य सेवा समिती

रायगड गौरव
सामाजिक : डॉ. भक्तीकुमार दवे
कला : ए. के. शेख, संजीवन म्हात्रे
शेती : आत्माराम हातमोडे,
वैद्यकीय : डॉ. शैलेश पालेकर
शिक्षण : बापूसाहेब नेने
कामगार : श्याम म्हात्रे

शेकाप कार्यकर्त्यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

मल्हार महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात शेकापचे मोठा खांदा येथील माजी नगरसेवक महेंद्र राजाराम कावळे आणि वाजे-सांगटोली येथील भरत सुदाम पाटील यांनी त्यांच्या समर्थकांसह काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

पक्षप्रवेशकर्ते

महेंद्र कावळे (माजी नगरसेवक), मिस्किन चंदू पाटील, सुरेश लक्ष्मण कावळे, राजू गंगाराम पाटील, यादव हशा पाटील, विलास तुकाराम भोईर, धनंजय रामा हुद्दार, दीपक महादेव पाटील, किशोर अंबाजी पेटकर, धीरज वामन पाटील, नितीन धनाजी पवार, सखाराम हशा पाटील, विनोद धर्मा भोईर, नितेश घुले, रुपेश वसंत कावळे, विलास राजाराम कावळे, मंगेश शालिक कावळे, स्वप्नील हरिश्चंद्र कावळे, रमेश हरिश्चंद्र म्हात्रे, यशवंत विष्णू कावळे, तुळशीदास हशा पाटील.

भरत सुदाम पाटील, संभाजी भरत पाटील, गणेश विठ्ठल भगत, मुन्ना दशरथ पाटील, किरण बबन पाटील, राजेश सखाराम पवार, रोहिदास भगवान पवार, नितेश गजानन पवार, निखील नामदेव पवार, प्रसाद गोपाळ पवार, प्रतिक रामभाऊ पवार, सुरेश सुरज पवार, विवेक लक्ष्मण पवार, चेतन गोपाळ म्हस्कर.